अभिसरण

ISSN-2229-4856

# नव्वदोत्तर मराठी साहित्य

## चर्चा आणि मीमांसा

संपादक
प्राचार्य डॉ. वसंत सानप

कार्यकारी संपादक
डॉ. गणेश मोहिते

सहसंपादक
डॉ. मनोहर सिरसाट

नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा । अभिसरण - विशेषांक मे २०२२

Scanned with CamScanner

# ॥ अभिसरण ॥

Special Issue : May- 2022 ISSN : 2229-4856

## नव्वदोत्तर मराठी साहित्य : चर्चा आणि मीमांसा

: मुख्य संपादक :

प्राचार्य डॉ. वसंत सानप

कार्यकारी संपादक : डॉ. गणेश मोहिते

सह संपादक : प्रो. डॉ. मनोहर सिरसाट

: संपादक मंडळ सदस्य :

डॉ. बाबासाहेब कोकाटे — डॉ. बापू जाधवर — प्रा. माणिक भताने

डॉ. रवींद्र काळे — डॉ. शैलेश आकुलवार — डॉ. ईश्वर छानवाल

डॉ. सुरेश घुमटकर — प्रा. महारुद्र जगताप — प्रा. संदीप परदेशी

: सल्लागार समिती :

डॉ. लक्ष्मीकांत देशमुख
अध्यक्ष, ९१ वे अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, बडोदा

डॉ. ताहेर पठाण,
मराठी विभाग प्रमुख, अलीगढ मुस्लिम
विद्यापीठ, अलीगढ (उत्तरप्रदेश)

डॉ. पृथ्वीराज तौर
मराठी विभाग, स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डॉ. सुधाकर शेंडगे,
प्रोफेसर, हिंदी विभाग, डॉ. बाबासाहेब मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. रावसाहेब जाधव,
प्राचार्य, पीपल्स कॉलेज, नांदेड

प्रो. आनंद उबाळे
इंग्रजी विभाग, डॉ. बाबासाहेब मराठवाडा
विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. शाम सिरसाठ,
प्रकुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

डॉ. प्रकाश पवार,
विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. अक्षय सरोदे
इंग्रजी विभाग,
डॉ. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. सय्यद अझरुद्दीन,
वाणिज्य विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (वाणिज्य)

डॉ. अण्णासाहेब गुरव
अधिष्ठाता (वाणिज्य), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. संतोष दास्ताने
समन्वयक, अर्थशास्त्र, विश्वकोश, निर्मिती मंडळ

* अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेल असे नाही.

Scanned with CamScanner

# "लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातून चित्रीत झालेले राजकीय वास्तव"

**प्रा. संदीप परदेशी**

सहाय्यक प्राध्यापक,

पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग,

बलभीम महाविद्यालय, बीड.

**प्रास्ताविक-**

साहित्य हा समाजाचा आरसा असतो असे म्हटले जाते. साहित्यातून त्या त्या काळातील घडणाऱ्या घटना, राजकारण, समाजकारण याचे प्रतिबिंब उमटलेले आपल्याला दिसते. कधी कधी साहित्यातून समाजजीवनाला प्रस्थापित समाजरचनेविरुद्ध बंड करण्याची प्रेरणाही मिळते. तर कधी साहित्यातून राजकीय जाणीव जागृती होते. साहित्य माणसाच्या जीवनाला आशय प्राप्त करून देण्याचे काम करते. तसेच मानवाला जगावे कसे हेही साहित्य शिकवते. साहित्यातून समाज जीवनातील वास्तवाचे चित्रण दिसते. समाजाला भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांची उत्तरे शोधणाऱ्या आणि समाजातील अंतर्विरोध याचा अचूक वेध घेणाऱ्या मोजक्या साहित्यिकांमध्ये लक्ष्मीकांत देशमुख यांचा समावेश होतो. लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या साहित्यातून लोकांच्या मनोरंजनाचे विषय न हाताळता त्यांनी आपल्या लेखनातून वैचारिक चळवळीला भक्कम अधिष्ठान देणारे विषय घेऊन एक वास्तवाभिमुख, चिंतनशील लेखन केलेले दिसते.मराठी साहित्यामध्ये प्रशासकीय पदावर कार्य करत असताना साहित्य लेखन करणारे मोजकेच लेखक आहेत. यात विश्वास पाटील, भारत सासणे, श्रीकांत देशमुख यानंतर लक्ष्मीकांत देशमुख हे महत्त्वाचे साहित्यिक ठरतात.

लक्ष्मीकांत देशमुख हे नव्वदोत्तर कालखंडातील महत्वाचे साहित्यिक आहेत. त्यांनी कादंबरी, कथा,ललित, वैचारिक अशा साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये तळागळातील सामान्य माणसांचे प्रश्न घेऊन वास्तव लेखन केलेले आपल्याला दिसते. एक प्रशासकीय अधिकारी असताना सामान्य लोकांशी आलेला संबंध, त्यांचे प्रश्न हाताळताना समाजात असणाऱ्या विविध समस्या या सर्वांचे चिंतन, मनन करून संवेदनशीलपणे त्यांनी लेखन केलेले आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या 'अंधेरनगरी' या कादंबरीतून चित्रित झालेल्या राजकीय वास्तवाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**'अंधेरनगरी' कादंबरीतून चित्रित झालेले राजकीय वास्तव-**

लक्ष्मीकांत देशमुख यांची अंधेर नगरी ही एक महत्त्वाची कादंबरी आहे ही कादंबरी १९९४ साली प्रकाशित झाली. या कादंबरीत महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकारणावर प्रकाश टाकलेला आहे. "या कादंबरीमध्ये मराठवाड्यातील नांदेड शहरात १९८८ ते १९९६ या काळात चाललेल्या नगरपालिकेच्या राजकारणाचे विशिष्ट सत्तेच्या राजकारणाचे चित्रण करण्यात आलेले आहे."१

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून राज्याच्या विकासासाठी इथे पंचायत राज्यव्यवस्थेच्या तीन स्तरांचे प्रारूप म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्वीकार करण्यात आला. याचा मुख्य उद्देश ग्रामीण नेतृत्वाला चालना देणे, लोकशाही मूल्य समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचविणे तसेच लोकशाही कारभारात लोकांचा सहभाग वाढवून सहभागी राजकीय संस्कृती निर्माण व्हावी हा होता. विशेषतः स्थानिक



Scanned with CamScanner

प्रश्नांची जाण राष्ट्रीय नेतृत्वापेक्षा स्थानिक लोकांना अधिक असते त्यामुळे स्थानिक प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमाने स्थानिक लोकांना दिली गेली. परंतु आज याच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आपल्याला सत्तासंघर्ष, पक्षीय राजकारण आणि आर्थिक हितसंबंध यामुळे सर्वसामान्य माणसांचे महत्त्वाचे प्रश्न बाजूला राहिलेले दिसतात. नगरपालिका, महानगरपालिका या शहराच्या विकासासाठी महत्त्वाच्या असतात. परंतु याच संस्थांनी आपले काम प्रामाणिकपणे न केल्याने शहरांचे अनेक गंभीर प्रश्न आज निर्माण झालेले दिसतात. अंधेरनगरी या कादंबरीचे लेखक लक्ष्मीकांत देशमुख हे स्वतः प्रशासकीय अधिकारी असल्यामुळे त्यांचा या संस्थांमधील सर्वच घटकांशी अगदी जवळून संबंध आलेला आहे आणि यामुळे या संस्थांतील राजकारण त्यांनी जवळून अनुभवले आहे. या स्व-अनुभवाचं वास्तव चित्रण त्यांनी आपल्या या अंधेरनगरी कादंबरी मधून साकारले आहे.

**डॉ.अशोक चौसाळकर यांच्या मते-**

"अंधेरनगरी या कादंबरीचे निवेदन मुख्यतः चार पातळीवर लेखकाने विकसित केले आहे. या चार पातळ्यांवर स्थानिक राजकारणात कसे संघर्ष निर्माण होतात व त्या पातळीवर त्या संघर्षाचे निराकरण कसे झाले. याचे त्यात विवेचन केले आहे. या चार पातळ्या खालील प्रकारच्या आहेत-

१) शहराचे नगराध्यक्ष लालाजी व त्यांच्या विरोधात उभे राहिलेले सत्तेचे राजकारण

२) शहरात नव्याने चालेले मुख्याधिकारी भांगे आणि लालाजी यांच्यातील संघर्ष

३) भांगे आणि भ्रष्ट नगरसेवक आणि भ्रष्ट नगर प्रशासन यांच्यातील संघर्ष

४)नगरपालिकेचे भ्रष्ट प्रशासन, नगरसेवक, त्यास पाठिंबा देणारे पक्षश्रेष्ठी, पत्रकार यांचा सामूहिक स्वार्थ आणि त्याविरुद्ध अत्यंत पराभूत भावनेने संघर्ष करणारा नागरी समाज"२

या चार पातळ्यांवर आकारास आलेल्या राजकीय समीकरणाचे वास्तव स्व- अनुभव कथन लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या अंधेर नगरी या कादंबरी मधून केलेले दिसते.

या कादंबरीतील लालाजी हे प्रामाणिक, मेहनती सिंधी सद्गृहस्थ आहेत. परंतु ते केंद्रीय मंत्री असलेल्या बड्या साहेबांच्या मर्जीने नगराध्यक्ष म्हणून विराजमान झालेले आहेत. त्यांची इच्छा या शहराचा विकास करण्याचे आहे. राजकारणाच्या माध्यमातून पैसा कमवणे नाही. परंतु लालाजी यांना पदावरून हटवून आपल्या हितसंवंधांचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या व्यक्तीला पद देण्यासाठी प्रयत्न करणारा एक नगरसेवकांचा हितसंबंधी गट आहे. असे आणखी काही गट आहे. यापैकी एक गट मुस्लीम नगरसेवकांचा आहे जो लालाजी च्या विरोधात आहे. दुसरा मराठा नगरसेवकांचा गट आहे. तर तिसरा मागास जातीतील नगरसेवकांचा गट आहे. तरीही लालाजी हे धोरणी असल्याने या सर्व गटांचे मनसुबे ते उधळून लावण्यात यशस्वी होतात. लालाजी जरी प्रामाणिक असले तरी त्यांना आपल्या गटातील नगरसेवकांच्या हिताची काळजी घ्यावी लागते. छोटी मोठी कंत्राटे देऊन लालाजी या नगरसेवकांचा आर्थिक फायदा करून देतात. एका अर्थाने लालाजी कितीही प्रामाणिक असले तरी ते त्यांच्या वर्तणुकीमुळे भ्रष्ट ठरले जातात. लक्ष्मीकांत देशमुख यांनी अंधेरनगरी या कादंबरीत जे राजकारणाचे वास्तव दर्शन चित्रित केले आहे ते आज महाराष्ट्रातील जवळपास सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणाशी जुळणारे आहे. लालाजी यांना या व्यवस्थेत टिकून राहायचे असेल तर अशी कामे करावीच लागणार होती. शेवटी राजकारणात आपले अस्तित्व टिकून ठेवणे हे गरजेचे असते. तसेच राजकारणाला अर्थकारणाची संगती असावी लागते. आधुनिक भारतीय राजकारणाचा जर विचार केला



Scanned with CamScanner

तर राजकारणाच्या मागे अर्थकारण आणि अर्थकारणाच्या मागे राजकारण हे एक समीकरणच बनले आहे. लक्ष्मीकांत देशमुख यांनी या समीकरणावर नेमकेपणाने कादंबरीतून लक्ष वेधले आहे. ज्या केंद्रीय मंत्र्याचा आशीर्वाद लालाजी वर होता त्यांचे हितसंबंध हद्दवाढीच्या प्रकरणामुळे धोक्यात आल्याने लालाजींना राजीनामा द्यावा लागला. परंतु लालाजीने कोऱ्या कागदावरील सहीचा दुरुपयोग करून आपले सहकारी प्रकाशभाई अध्यक्ष होऊ नये याची सर्व व्यवस्था करून ठेवली. यावरून लक्ष्मीकांत देशमुख राजकारणात चांगल्या वृत्तीचा नैतिक अध:पात कसा होतो याचे वास्तव चित्रण कादंबरीच्या रुपाने करतात.

लक्ष्मीकांत देशमुख हे संघर्षाची दुसरी पातळी सांगताना कर्तव्यदक्ष अधिकारी भांगे चे चित्रण करतात. भांगे यांना नगरपालिकेच्या भ्रष्ट यंत्रणेशी संघर्ष करावा लागतो. प्रशासन, राजकीय नेते, जनता, नगरपालिका या सर्व घटकांना विश्वासात घेऊन भांगे यांना विकास करायची इच्छा आहे. परंतु या सर्व घटकातील हितसंबंधाचे स्वरूप वेगवेगळे असल्यामुळे भांगे यांना खूप मेहनत करावी लागते. अतिक्रमण निर्मूलनात बहुसंख्य मागास जाती, गरीब मुस्लीम  सुमारे शंभर कुटुंबांना बेघर व्हावे लागणार होते. भांगे यांना या लोकांना बेघर करायचे नव्हते. परंतु कर्तव्यही करावे लागणारच होती. कारवाईनंतर भांगे यांची बदली होणार हे निश्चित होते. आज भारतातील अनेक भागात कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांचा राजकारणाने बळी घेतलेला आपणाला दिसतो. कर्तव्य करताना होणारा राजकीय हस्तक्षेप हा प्रशासकीय अधिकाऱ्यां समोरील आज महत्त्वाचा प्रश्न बनत चालला आहे. भारतात अनेक ठिकाणी राजकारणी लोक सार्वजनिक जागा गिळंकृत करताना आपल्याला दिसतात. असे असले तरी इथे कर्तव्या बरोबर आपल्या व्यवस्थेने दुसरे एक आत्मचिंतन करण्याची गरज आहे. एका बाजूला गरीब लोकांच्या झोपड्या अतिक्रमण म्हणून  हटवल्या जातात. त्यांना या देशात हक्काची जागा नाही का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न प्रशासन आणि शासनाला करण्याची गरज का वाटत नाही? हा एक भारतातील मूलभूत प्रश्न आहे.

तिसरी पातळी ही लालाजी व अधिकारी यांच्यातील संघर्ष अशी होती. यांच्यात असे संघर्ष होण्याचे कारण नव्हते. परंतु भांगे प्रशासकीय अधिकारी तर लालाजी राजकीय नेते. दोघांची एकीकडे प्रामाणिक कर्तव्य आणि दुसऱ्या बाजूला लालाजींची राजकीय समीकरणे होती. त्यामुळे लालाजींना आपले राजकारण टिकविण्यासाठी भांगे यांच्याशी संघर्ष करणे अपरिहार्य होते. आपल्या पाठीराख्या नगरसेवकांच्या हिताचे रक्षण करत राजकारण लालाजीला करावे लागणार होते. त्यामुळे भांगेच्या बदलीत लालाजीला लक्ष द्यावे लागले. हा राजकारणाचा नैतिक अध:पात लक्ष्मीकांत देशमुख यांनी चित्रित केलेला दिसतो.

चौथी पातळीतून लक्ष्मीकांत देशमुख अशा संघर्षा कडे वाचकांचे लक्ष वेधतात जो खूप क्षीण स्वरूपाचा आहे. या संघर्ष पातळीचे स्वरूप नगरपालिकेची भ्रष्ट प्रशासन यंत्रणा व त्यांची पाठराखण करणारे भ्रष्ट नगरसेवक आणि नागरी समाज यांच्यातील आहे. नागरी समाजातील काही लोक संघर्ष करतात. त्यामध्ये आबा गुरुजी, कर्नल मोडक यांनाही संघर्ष करणे अशक्य होते. पत्रकार मालखरे हितसंबंधांमुळे हतबल होतात. काही लोक अलिप्त राहतात. काहींना नेहमीप्रमाणे भारतीय राजकारणाच्या प्रमुख वैशिष्ट्याप्रमाणे पोलीस कोठडी नशिबी येते.

लक्ष्मीकांत देशमुख यांनी अंधेरीनगरी या कादंबरीमधून चित्रित केलेल्या राजकीय वास्तवातून एक गोष्ट जाणवते ती म्हणजे, ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांना आपण लोकशाहीची प्राथमिक शाळा म्हणतो त्या



Scanned with CamScanner

शाळेतूनच राजकारणाच्या राजकीय नैतिकतेचे अधःपतन करणारे पाठ शिकवले जात आहेत.याने आपली लोकशाही कुठे जात आहे?

लक्ष्मीकांत देशमुख यांनी केलेले हे राजकारणाचे वास्तव चित्रण आपणाला विचार करायला लावणारे आहे. तसेच राजकारण आणि समाजकारण यामध्ये द्वैत असल्याचेही दिसते. अर्थात लक्ष्मीकांत देशमुख यांनी अंधेरनगरी ही कादंबरी "राजकीय कादंबऱ्यात वैशिष्ट्यपूर्णतेने भर टाकणारी कादंबरी आहे. देशमुखांनी नगरपालिका आणि त्यातून प्रतिबिंबित होणारे भ्रष्ट समाजकारण, त्या भ्रष्ट समाजकारणाला गती देणारे सत्तेचे राजकारण आणि सर्व देशाच्या सत्तापिपासेतून उत्पन्न होणारी हिंस्र, क्रूर, स्वार्थांध, आत्मकेंद्रित शासन या वास्तवाचा वेध घेतला आहे.३

**सारांश-**

लक्ष्मीकांत देशमुख यांनी आपल्या साहित्यातून केलेल्या राजकीय चित्रणामध्ये नवसमाज निर्मितीची आस आहे. त्यांच्या साहित्यातील काही नायक हे प्रस्थापित समाजव्यवस्थेला नाकारून एका नव्या समाजाच्या शोधात असल्याचे आपणाला दिसतात. त्यांच्या राजकीय विचारांचे मराठी साहित्याच्या वैचारिक चळवळीत महत्त्वाचा ठसा आपल्याला उमटविलेला आपणास दिसतो. राजकारण हे समाजाच्या भल्यासाठी आवश्यक आहे. असे लक्ष्मीकांत देशमुख यांचे मत आहे. परंतु राजकारण आणि समाजकारण यांच्यातील द्वैत ते मान्य करून या दोन गोष्टी वेगळ्या आहेत हे त्यांचं म्हणणे आहे. परंतु त्यांच्या लिखाणात राजकारणाचे झालेल्या नैतिक अधःपतन याबाबत चिंता आहे. असे घडणे लोकशाही व्यवस्थेला पोषक नाही हेही ते सांगतात. प्रशासनातील राजकीय हस्तक्षेप हा कर्तव्यदक्ष प्रशासकीय अधिकाऱ्यां समोरील एक मोठा प्रश्न आहे असेही ते सांगतात.

लक्ष्मीकांत देशमुख यांनी चित्रित केलेले राजकीय वास्तवाचे चित्रण हे नवसंशोधकांना,लेखकांना प्रेरणादायी असे आहे. साहित्यातून केलेले वास्तव चित्रण विचार करायला लावणार आहे.

**संदर्भ ग्रंथ-**

**प्राथमिक साधने-**

१. देशमुख लक्ष्मीकांत,(१९९४): अंधेरनगरी, साकेत प्रकाशन, औरंगावाद.

**दुय्यम साधने-**

१. चौसाळकर अशोक, (२०१५): 'सत्ताकारण व समाजहित यांच्यातील द्वैत' अन्वयार्थमधील लेख पुणे. पृ.क्र.१४८-१४९

२. तत्रैव. पृ.क्र.१४९

३. बांदिवडेकर चंद्रकांत, (२०१५): 'राजकीय इतिहासाचे चित्रण' अन्वयार्थमधील लेख पुणे. पृ. क्र.१८०



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| २० | 'आले ढग... गेले ढग' मधील सामाजिक प्रश्न | डॉ. एम.ए.कव्हळे | १०१ |
| २१ | कृषिव्यवस्थेतील वर्तमान वास्तव : 'या परावलंबी दिवसात' | डॉ. शंकर हणमंतराव कल्याणे | १०४ |
| २२ | साहित्यकृती आणि चित्रपट निर्मिती | प्रा.डॉ.धोंडगे एम.बी.<br>कांदे केशव अंगदराव | १०९ |
| २३ | चरित्र -आत्मचरित्र : स्वरूप व संकल्पना | डॉ. सुनीता अंबादास बोराडे | ११२ |
| २४ | नव्वदोत्तरी मराठी ग्रामीण कवितेला दिशा देणारी कविता: पिढीपेस्तरप्यादेमात | प्रा.बाळू मोहन तिखे | ११६ |
| २५ | "लक्ष्मीकांत देशमुख यांच्या साहित्यातून चित्रीत झालेले राजकीय वास्तव" | प्रा. संदीप परदेशी | १२० |
| २६ | लोककला तमाशाचे बदलते स्वरूप | तुकाराम हरिश्चंद्र देवकर<br>प्रो. एम. बी. धोंडगे | १२४ |
| २७ | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा | प्रा. लक्ष्मण गित्ते | १२७ |
| २८ | स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीत्वाचे दर्शन | कैलास मच्छिंद्रनाथ होके<br>प्रा.डॉ. बाळासाहेब जाधव | १३१ |
| २९ | जागतिकीकरण आणि नव्वदोत्तरी दलित कथा | प्रा.डॉ. संजय राजधर महाले | १३६ |
| ३० | 'नव्वदोत्तर मराठी ग्रामीण कादंबरी' (विशेष संदर्भ : 'साखरफेरा') | प्रा. महारूद्र सूर्यभान जगताप | १४२ |
| ३१ | दलित जाणिवा शब्दांकित करणारी निस्र्गार्कीत कविता : मोहाडी | प्रा.डॉ.प्रल्हाद दत्तराव भोपे | १४६ |
| ३२ | प्रा. वामन निंबाळकर : मूल्याधिष्ठित जाणिवा आविष्कृत करणारा मोठा कथालेखक | प्रोफेसर डॉ. मनोहर सिरसाट | १५२ |
| ३३ | मानवी प्राक्तन शब्दबद्ध करणारी कविता- काळी माती निळे आभाळ | डॉ. गणेश मोहिते | १५५ |
| ३४ | मार्ग कादंबरीतील पर्यावरणवादी विचार | प्रा.सौ. विलिना इनामदार | १६० |
| ३५ | "1990 नंतरच्या कथेचा अभ्यास" | प्रा. डॉ. शंकर शिवाजी मुंडे | १६९ |
| ३६ | मोतीराज राठोड यांच्या वैचारिक साहित्यातील विमुक्तांचे जीवनमूल्ये | डॉ. आकाश ब. पवार | १७४ |


Scanned with CamScanner